दिपक मधुकर भोंडवे यांच्या माध्यमातून शिधापत्रिका मेळावा संपन्न

e Paper




दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | सोमवार दिनांक 04/08/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 171 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महसूल विभाग सक्षम - मुख्यमंत्री

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नागपूर : महसूल विभाग राज्याच्या आर्थिक विकासाचा कणा असून गतिमानता, पारदर्शकता व तत्परतेने सेवा देणारा विभाग म्हणून याची ओळख आहे. सध्या राज्यातील जनतेला सर्वाधिक ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देणारा हा विभाग असून अधिक लोकाभिमुखतेसाठी महसूल परिषदेत अभ्यासगटांनी सादर केलेल्या शिफारशी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दिशादर्शक ठरतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल परिषदेच्या समारोपप्रसंगी व्यक्त केला.




भारतीय प्रबंध संस्थान (आयआयएम), नागपूर येथे आयोजित महसूल परिषदेच्या दुसऱ्या दिवशी झालेला चर्चासत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, जमाबंदी आयुक्त, नोंदणी महानिरीक्षक, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व महसूल विभागाशी संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कालानुरूप महसूलविषयक कार्यप्रणालीशी संबंधित धोरणात्मक बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली असून तंत्र कौशल्याच्या बळावर हा विभाग अधिकाधिक सक्षम व लोकस्नेही करण्याचा प्रयत्न राज्य शासनाकडून करण्यात येत आहे. या सर्व धोरणात्मक बाबींवर चर्चा, मंथन व मूल्यमापन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या महसूल परिषदेचा समारोप मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

या परिषदेत विभागीय आयुक्त प्रमुख असलेल्या समित्यांकडून विविध अहवाल सादर करण्यात आले. महसुली कामकाजात सुसूत्रता व गतिमानता आणण्यासाठी आवश्यक त्या बाबी त्यांनी मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिल्या. महसुली सेवा व योजनांच्या लाभांपासून एकही नागरिक वंचित राहू नये यासाठी अधिकाधिक सेवा ऑनलाईन पद्धतीने देण्यासोबतच त्यात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सादरीकरणाच्या माध्यमातून महत्वपूर्ण बाबी समितीकडून मांडण्यात आल्या. या विषयाचा शासनास सादर करण्यात येणारा अहवाल अचूक व निर्दोष असावा यासाठी प्रत्येक बाबींचा सखोल अभ्यास करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

परिषदेतील विचारमंथन दिशादर्शक दैनंदिन जीवनात सामान्य नागरिकांना विविध कामांच्या निमित्ताने वारंवार महसूल विभागाशी संपर्क साधावा लागतो. या परिषदेच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या धोरणात्मकबाबी केवळ जिल्हा मुख्यालय स्तरावरच नव्हे तर उपविभाग व तालुकास्तरावरही सर्वांसाठी अत्यंत उपयोगी सिद्ध होणार असल्याची भावना महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

या परिषदेच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कल्पना, विविध उपाययोजना व उपक्रमांच्या माहितीचे आदानप्रदान झाले असून यातून प्रशासनात नवी कार्यपद्धती अस्तित्वात येईल. तसेच ही परिषद विभागाच्या भविष्यातील वाटचालीसाठी दिशादर्शक ठरणार असल्याची भावना अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# पिंपरी महापालिकेच्या 57 नागरी सेवा ऑनलाइन

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेचे प्रशासकीय कामकाज डिजिटल पद्धतीने सुरू केल्यानंतर आता ५७ सेवा ऑनलाइन झाल्या आहेत. या सेवांचा लाभ नागरिकांना घरी बसून थेट ऑनलाइन पद्धतीने घेता येणार आहे. यासाठी नागरिकांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. राज्य शासनाच्या १५० दिवसीय कृती आराखड्यांतर्गत ही सेवा सुरू करण्यात आली आहे.महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर येऊन नागरिकांना सर्वप्रथम स्वतःचे खाते तयार करावे लागणार आहे. ही प्रक्रिया केवळ एकदाच करावी लागेल. यामध्ये ओटीपीद्वारे नागरिकाचा मोबाइल नंबर तपासून संग्रहित केला जाईल. आपल्या खात्यामध्ये नागरिकांनी लॉग-इन केल्यानंतर संबंधित सुविधेला नागरिक अर्ज करू शकतात.यासाठी लागणारी कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करून प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. ऑनलाइन सेवेसाठी नागरिकांना काोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.ही सेवा नागरी सुविधा केंद्रामार्फत घेत असल्यास नागरिकांना सेवेचे ५० रुपये शुल्क भरणे आवश्यक आहे. शुल्काची रक्कम भरल्यास ती प्राप्त झाल्याबाबत नागरिकांना संदेश देण्याची सुविधा पुरविण्यात आलेली आहे. एखाद्या सशुल्क सेवेचा लाभ घेण्यासाठी अर्जांबरोबर पूर्ण रक्कम भरावी लागणार आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महापालिकेकडून देणारा अंतिम दाखला हा ऑनलाइन पद्धतीने डाउनलोड करून घेण्यास उपलब्ध केला जाणार आहे.विविध दाखले, नकाशे, ना-हरकत प्रमाणपत्रांसाठी गेल्या आर्थिक वर्षात ७७ हजार ७७३ अर्ज आले होते. या दाखल्यांपोटी १८७ कोटी ५८ लाख रुपयांचे संकलन झाले.

तर, चालू आर्थिक वर्षात विविध प्रमाणपत्रांसाठी आत्तापर्यंत २३ हजार ३८३ अर्ज आले होते. त्यातून ४२ कोटी १५ लाख रुपयांचे उत्पन्न महापालिकेला मिळाल्याचे नागरी सुविधा विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

# पिंपरी चिंचवड महापालिकेचे निवारा केंद्र निराधारांसाठी ठरतंय आधार

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: कधी कुणी नात्यांपासून दूर गेलेलं, तर कुणी रस्त्यावर बेवारस अवस्थेत सापडलेलं... काहींना मानसिक-शारीरिक आजारांनी ग्रासलेलं, तर काहींना दोन घास मिळवण्यासाठी रस्तोरस्ती भटकावं लागलेलं... अशा प्रत्येक निराधारासाठी “सावली” हे केवळ निवाऱ्याचं ठिकाण नाही, तर मायेचा एक जिवंत स्पर्श ठरत आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या या निवारा केंद्राने अशा निराधारांना समाजाच्या प्रवाहात परत आणण्याचं काम हळुवारपणे आणि निःस्वार्थपणे हाती घेतले आहे. रिअल लाइफ रिअल पीपल या संस्थेच्या सहकार्याने चालवण्यात येत असलेल्या या “सावली निवारा केंद्राला” अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. लाभार्थ्यांशी आपुलकीने संवाद साधत, त्यांच्या अवस्था समजून घेत त्यांना नव्या उमेदीनं जगण्याची ऊर्जा दिली.**






‘सावली’ निवारा केंद्रात सध्या निराधार, बेघर, मानसिकदृष्ट्या आजारी, तसेच रस्त्यावर सापडलेले वंचित पुरुष आणि महिलांना सुरक्षित निवारा, अन्न, औषधोपचार आणि सल्लामसलत सेवा मोफत दिली जाते. या केंद्रात सध्या विविध वयोगटातील लाभार्थ्यांचा निवास आहे. काहींच्या डोळ्यात अजूनही काळजी आहे, पण तितकीच असते इथल्या माणसांच्या आपुलकीची जाणीव. या केंद्रातील कर्मचारी केवळ सेवा नाही, तर प्रेमाची आणि समजूतदारपणाची ऊबही देतात. या निवारा केंद्राला अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी भेट दिली. केंद्रामध्ये प्रवेश करताच जांभळे पाटील यांचे स्वागत केंद्रामध्ये असणाऱ्या लाभार्थी महिलांनी गुलाबाचे पुष्प देऊन केले. त्यानंतर जांभळे पाटील यांनी या सर्वांशी मनमोकळा संवाद साधला.

"तुम्हाला केंद्रामध्ये कसे वाटत आहे? येथील जेवण कसे आहे? तुम्ही येथे कसे पोहोचलात?" अशी आपुलकीने जांभळे पाटील यांनी लाभार्थ्यांची विचारपूस केली. यावेळी लाभार्थ्यांनी केंद्रामध्ये उत्तम सोयीसुविधा मिळत असल्याचे सांगत त्याबद्दल पिंपरी चिंचवड महापालिका व रिअल लाइफ रिअल पीपल संस्थेचे आभार मानले.

"आम्हाला येथे काही अडचण नाही. हे केंद्र म्हणजे आमचा परिवार आहे. येथे आम्हाला अन्न, वस्त्र, निवारा सर्व काही मिळाले आहे. आम्ही येथे आनंदात आहोत. येथे आमची खूप काळजी घेतली जाते," अशा भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या. यावेळी जांभळे पाटील म्हणाले की, "सावली केंद्रामध्ये तुम्हाला आणखी काही सोयीसुविधा लागल्या तर नक्की सांगा. मला तुमचा मुलगा समजून हक्काने काहीही लागले तरी हाक द्या."

सावलीतून उभारी... आणि पुन्हा आयुष्याला सुरुवात!

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सुमारे आठ ते नऊ महिन्यांपूर्वी एका बेघर, निराधार व्यक्तीची माहिती ‘रिअल लाइफ, रिअल पीपल’ संस्थेचे एम. ए. हुसैन यांना दिली होती. या संवेदनशीलतेतून सुरू झालेली ही गोष्ट आज प्रेरणादायी ठरतेय. हुसैन यांनी त्या व्यक्तीला ‘सावली’ निवारा केंद्रात आणून हक्काचा निवारा दिला. आज हीच व्यक्ती केंद्रात उदबत्ती, धूप अशा पूजासाहित्याची विक्री करत आहे. ही प्रगती पाहून जांभळे पाटील यांनी समाधान व्यक्त केले. या केंद्रामध्ये निराधारांना स्वावलंबी करणारी अनेक उदाहरणे पाहण्यास मिळत असून हे केंद्र केवळ पुनर्वसनासाठी नव्हे, तर आयुष्याची नवी सुरूवात करून देणारे ठरू लागले आहे.

केंद्राला आवश्यक ते मदत करण्याचे दिले निर्देश

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सावली केंद्राची पाहणी करून तेथे दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधांची माहिती घेतली. केंद्रामध्ये लाभार्थ्यांच्या निवासासाठी असणारे हॉल, स्वयंपाकघर, लाभार्थ्यांना पुस्तके वाचण्यासाठी करण्यात आलेली सुविधा, सीसीटीव्ही व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, स्टोअर रूम अशा विविध ठिकाणांची पाहणी जांभळे पाटील यांनी करून समाधान व्यक्त केले. याप्रसंगी केंद्रांत येण्यासाठी रॅम्पची व्यवस्था, लाभार्थ्यांना रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी गाडीची व्यवस्था, विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर बॅटरी बॅकअपची व्यवस्था करण्याबाबत तातडीने निर्देश महापालिकेच्या संबंधित विभागांना जांभळे पाटील यांनी दिले. केंद्रातील लाभार्थ्यांना जास्तीतजास्त शासकीय योजनांचा लाभ द्या, ज्या लाभार्थ्यांकडे आधार कार्ड नसेल तर ते काढण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करा, केंद्रामध्ये जास्तीतजास्त सोयीसुविधा द्या, असे निर्देशही त्यांनी दिले.

निराधारांना मायेची ऊब देण्याचे काम सावली निवारा केंद्रामार्फत होत असल्याचे पाहून अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी समाधान व्यक्त केले. तसेच निःस्वार्थ सेवेच्या भावनेतून सावली निवारा केंद्रात काम करणाऱ्या रिअल लाइफ रिअल पीपल संस्थेचे एम. ए. हुसैन व व्यवस्थापक गौतम थोरात, सहाय्यक व्यवस्थापक सचिन बोधनकर, समाजसेवक ॲग्नस फ्रान्सिस, एच. शहानवाज, काळजीवाहक अमोल भाट, लक्ष्मी वाईकर, विष्णू गायकवाड, कुक उमा भंडारी, लक्ष्मी कांबळे यासर्वांच्या कामाचे कौतुक करून त्यांचा सन्मान केला.

समाजातील निराधार व्यक्तींना हक्काचा निवारा देण्याचे काम पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सावली निवारा केंद्रात होत आहे. महापालिकेच्या या प्रयत्नामुळे समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी नवा आशेचा किरण निर्माण झाला आहे. सावली हे केवळ निवाऱ्याचं केंद्र न राहता, माणुसकीच्या नात्यांनी बांधलेली एक सशक्त व्यवस्था बनत चालली आहे. या उपक्रमातून केवळ सामाजिक जबाबदारी नव्हे, तर एका संवेदनशील शहराची ओळख अधिक दृढ होत आहे. आजच्या भेटीत लाभार्थ्यांशी संवाद साधताना ते येथे आनंदात असल्याचे लक्षात आले. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आमच्यासाठीही समाधान देणारा असून हा उपक्रम खूपच यशस्वी होत असल्याचा आनंद आहे.

- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

सावली निवारा केंद्रामध्ये असलेल्या निराधार व्यक्तींसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाकडून सातत्याने विविध उपक्रम राबवले जात असतात. येथे येणारी प्रत्येक बेघर, निराधार व्यक्ती ही समाजाचा एक अविभाज्य घटक मानली जाते आणि तिला आवश्यक ती सर्व मदत अत्यंत संवेदनशीलतेने करण्यात येते. केवळ निवारा आणि अन्नपुरवठाच नव्हे, तर पुनर्वसन, मानसिक आधार आणि आत्मसन्मानाची जाणीव देणारे वातावरण येथे तयार केले गेले आहे.

- ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

नागरी बेघरांसाठी निवाऱ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण करण्यासाठी राज्य शासनाने गठीत केलेल्या निवारा सनियंत्रण समितीच्या निर्देशानुसार त्रिशरण एनलायनमेंट फाउंडेशनने विविध निवाऱ्यांचे परीक्षण करून अहवाल सादर केला. या अहवालात सावली बेघर निवारा केंद्र हे संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वोत्तम निवाऱ्यांपैकी ‘प्रथम क्रमांकावर’ असल्याचे घोषित करण्यात आले आहे. आज पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील आणि उपायुक्त ममता शिंदे यांनी या केंद्राला भेट दिली असून ही भेट आमच्या संस्थेतील निराधार आई-वडिलांसाठी आश्वासक ठरली असून यातून आम्हाला अधिक जबाबदारीने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

– एम. ए. हुसैन, संस्थापक अध्यक्ष, रिअल लाइफ रिअल पीपल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
सोमवार दिनांक 04/08/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# मा. नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा









>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**भाजपाचे प्रदेश सदस्य माजी नगरसेवक ॲड. मोरेश्वर शेडगे यांचा वाढदिवसनिमित्त वाढदिवस मोठ्या उत्साहात विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.**

**शेडगे यांच्या वाढदिवसानिमित्त चिंचवडगावातील गोशाळेतील गोमातांना चारा वाटप, चिंचवड प्रभाग क्रमांक 18 मधील सर्व सन्मानीय जेष्ठ नागरिकांचा सत्कार, आयुष्यमान भारत वयो वंदना योजना स्मार्ट कार्ड, नव मतदार नोंदणी अभियान, मोफत आधार व मतदान स्मार्ट कार्ड वाटप आणि अभिष्टचिंतन सोहळा या कार्यक्रमांचे नगरसेवक ॲड. मोरेश्वर शेडगे मित्र परीवाराच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.**

यावेळी भाजपा पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, चिंचवड विधानसभेच्या माजी आमदार श्रीमती अश्विनीताई जगताप, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, पिं.चिं.नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, विश्व हिंदू परिषद पिंपरी चिंचवड जिल्हामंत्री धनंजय गावडे, सामाजिक समरसता मंचाचे पंजाबराव मोंढे, माजी नगरसेवक राजाभाऊ दुर्गे, जेष्ठ नेते रविंद्रजी देशपांडे, जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष रमेशची इनामदार, नंदकुमार मुरडे, प्रयास महीला ग्रुपच्या अध्यक्षा शोभाताई निसळ, मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष पर्बत गुरुजी सर, व सिटी प्राईड स्कूल चे डॉ.अभय कुलकर्णी सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी जेष्ठ नागरिकांना पावसाळ्यात उपयुक्त पडतील अशा भारतीय बनावटीच्या छत्र्या व उबदार शालींचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी जेष्ठ नेते माजी सरपंच पै. ज्ञानेश्वर शेडगे, अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाचे प्रदेश अध्यक्ष सचिन बोधणी, चिंचवड देवस्थान संस्थानचे विश्वस्त जितेंद्र देव, भाजपा प्रदेश राज्य परिषद सदस्य पाटीलबुवा चिंचवडे, हनुमंत लांडगे, धर्मेंद्र क्षीरसागर, भाजपा शहर सरचिटणीस शीतल शिंदे, अजय पाताडे, कामगार नेते माजी नगरसेवक यशवंत भोसले, जेष्ठ नगरसेवक प्रदेश सदस्य चंद्रकांतआण्णा नखाते, मा.नगरसेवक शशिकांत कदम, संदीप कस्पटे, सुरेश भोईर, राजेंद्र गावडे, राजाभाऊ गोलांडे, सिद्धेश्वर बारणे, प्रमोद ताम्हणकर, नगरसेविका आरतीताई चोंधे, निर्मलाताई कुटे, शारदाताई सोनवणे, योगिताताई नागरगोजे, सुनिताताई तापकीर, शारदाताई बाबर, भारत केसरी पै.विजय गावडे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, विजय फुगे, राम वाकडकर, प्रभाग समिती सदस्य विठ्ठल भोईर, बिभीषण चौधरी, देवीदास पाटील, कामगार नेते अंबर चिंचवडे, चिंचवड ग्रामस्थ आवेशदादा चिंचवडे, खंडूशेठ चिंचवडे, दत्ताभाऊ चिंचवडे, पाटीलबुवा चिंचवडे, कैलासकाका गावडे, शेखरआण्णा चिंचवडे, हरिभाऊ चिंचवडे, नरेंद्र भोईर, राहुल भोईर, पांडूरंग चिंचवडे, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे सदस्य गतीराम भोईर, राजेंद्र चिंचवडे, भिवाजी गावडे, योगेश चिंचवडे, सागर चिंचवडे, विनीत पवार, विनायक चिंचवडे, संतोष निंबाळकर, धनंजय शाळीग्राम, राघूशेठ चिंचवडे, दिपक गावडे, सूरज भोईर, महेश लांडगे, भाजयुमो प्रदेश सचिव अजित कुलथे, विश्वास राऊत, सुभाष मालुसरे, ब्राम्हण महासंघाचे पिंपरी चिंचवड कार्याध्यक्ष महेश बारसावडे, भाजपा शहर सचिव मधुकर बच्चे, ओबीसी मोर्चाचे शहर भाजपा सरचिटणीस प्रशांत आगज्ञान, प्रभाग अध्यक्ष विठ्ठल भोईर, भाजपा प्रदेश पदाधिकारी प्रदीप सायकर, कैलास कुटे, महादेव कवितके, नामदेव पवार, नंदुकाका भोगले, जयदेव देब्रा, जयेश चौधरी, मनोज तोरडमल, खंडूदेव कठारे, दत्तात्रय ढगे, जवाहर ढोरे, गणेश वाळुंजकर, नरेश पंजाबी, कैलास सानप, जयदीप खापरे, अमित पसरणीकर, धनंजय ढोरे, नवनाथ ढवळे, संकेत चोंधे, बाळासाहेब लोंढे, चंद्रकांत अरसूळ, दीपक नागरगोजे, भाजपा महिला पदाधिकारी राजश्री जायभाय, आशाताई काळे, नीता कुशारे, प्रतिभाताई जवळकर, सीमाताई चव्हाण, शोभाताई बोराडे, मंगेश धाडगे, प्रकाश लोहार, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल सायकर, संकेत कुटे, चापेकर उद्यान जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष रमेश देव, शामकांत खटावकर काका, चिंचवड जेष्ठ नागरिक संघाचे गोपाळ भसे, सुरेश जोशी आदी प्रमुख पदाधिकारी, पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अजित कुलथे तर यांनी मधुकर बच्चे यांनी आभार मानले.

# दिपक मधुकर भोंडवे यांच्या माध्यमातून शिधापत्रिका मेळावा संपन्न

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : दिपक मधुकर भोंडवे सोशल फाउंडेशन यांच्या माध्यमातून दि.०२-०८-२०२५ रोजी समीर लॉन्स,रावेत येथे शिधापत्रिका मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. रावेत-किवळे-विकासनगर-मामुर्डी प्रभागातील लोकांची शिधापत्रिका संदर्भात अनेक कामे या ठिकाणी करण्यात आली. आपल्या संपूर्ण परिसरात वाढलेली लोकसंख्या त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध ्न जिल्ह्यातून भागातून कामानिमित्त शिक्षणाकरिता स्थलांतरित झालेल्या नागरिक व कुटुंबांचे नवीन शिधापत्रिका बनवणे, राशन कार्ड स्थलांतर, कुटुंबातील सदस्यांचे नाव वाढवणे, कमी करणे,KYC व इतर दुरुस्ती कामे या शिबिराच्या माध्यमातून करण्यात आली."O N E NATION-ONE RATION CARD"प्रणाली संपूर्ण देशात आणि राज्यात अंमलबजावणी झाल्यानंतर अनेक तांत्रिक अडचणींनातोंड द्यावे लागत होते. तसेच अन्नपुरवठा विभागातही सर्वसामान्यांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत होते. नागरिकांना शासनाच्या विविध लोक- कल्याणकारी योजनांचे लाभ घेण्याकरिता तसेच विभिन्न शासकीय,शैक्षणिक सुविधांकरिता शिधापत्रिका हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहे. मुख्यतः गरजू लाभार्थींना अन्नपुरवठा विभागाच्या माध्यमातून पुरविण्यात येणाऱ्या अन्नसुरक्षा योजनांचा लाभ घेता यावा व कोणताही लाभार्थी वंचित राहू नये याकरिता ह्या उपक्रमातून सदर लाभार्थींचे अडचणींचा निवारण करण्यात आले.या मेळाव्यात सुमारे ६४० हून अधिक नागरिकांचे शिधापत्रिका संदर्भातील विविध कामे करण्यात आली. या उपक्रमातून लाभ घेतलेल्या सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्ट दिसून येत होते.सदर उपक्रमाला अन्नपुरवठा विभाग, निगडी येथील डॉ. क्षीरसागर साहेब (पुरवठा विभाग प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली सौ.चैताली गायकवाड (पुरवठा निरीक्षक), सौ.रेशमा कुंभारे(वरिष्ठ लिपिक), शुभम तांबे, गणपत राजे यांचे संपूर्ण उपक्रमाला मोलाचे सहकार्य लाभले.




तसेच उपक्रमासाठी धर्मपाल तंतरपाळे, सिंधुताई तंतरपाळे, राहुल भोंडवे, माधुरी सावळे, वैशाली वाकचौरे, संतोष म्हस्के, सविता शिवले, चंद्रकांत गाडे यांचेही बहुमूल्य योगदान व सहकार्य लाभले.याप्रसंगी संतोष(आप्पा) भोंडवे, सुनील भोंडवे, संतोष भोंडवे, अजय भोंडवे, प्रशांत महाजन, सचिन गावडे, अभिजीत पाटील आदी उपस्थित होते.

# मराठी पत्रकार संघ व ईशा नेत्रालय आयोजित नेत्रचिकित्सा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चिंचवड : पिंपरी चिंचवड मराठी पत्रकार संघ आणि ईशा नेत्रालय पुणे विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार व कुटुंबियांसाठी मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ईशा नेत्रालय, प्रीमियर प्लाझा, बिग बजार, चिंचवड स्टेशन येथे हे नेत्रचिकित्सा शिबीर घेण्यात आले. नेत्रचिकित्सा शिबिराचे उद्घाटन ईशा नेत्रालयाचे पुणे ब्रांच इन्चार्ज दीपक कदम व पिंपरी चिंचवड मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदकुमार सातुर्डेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी आधुनिक पद्धतीने नेत्र तपासणी करण्यात आली. त्याबरोबरच डोळ्यांचे आजार तसेच डोळ्यांची काळजी कशी घ्यावी याबाबत डॉ. वैभव अवताडे,डॉ. जयशील नाझरे यांनी मार्गदर्शन केले.




डॉ. वैभव अवताडे म्हणाले की, बीपी तसेच मधुमेह असलेल्या रुग्णांनी डोळ्यांची विशेष काळजी घ्यायला हवी. वेळीच काळजी घेतली तर दृष्टी वाचवता येईल. आजार वाढल्यानंतर रुग्ण रुग्णालयात धाव घेतात अशा वेळी फक्त असलेली दृष्टी टिकवणे शक्य होते. त्याबरोबरच 40 वर्षपेक्षा अधिक वय झाल्यानंतर सर्वांनीच डोळ्याचा पडदा,प्रेशर याची तपासणी करून घ्यावी. असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. जयशील नाझरे म्हणाले की, लहान मुलांनाही मधुमेह तसेच मोतीबिंदू होऊ शकतो. मात्र हे वेळीच लक्षात येत नाही. कधी कधी पालक चष्म्याचा आळस करतात. त्यामागे आर्थिक कारणे ही असतात. मात्र पुढे लष्करात किंवा पोलिसात भरती होण्याची इच्छा पूर्ण होत नाही तेव्हा नैराश्य येते. त्यामुळे वेळीच काळजी घ्यायला हवी.

इशा नेत्रालयाचे पुणे ब्रांच इन्चार्ज दीपक कदम यांनी ईशा बद्दल माहिती दिली. ईशान नेत्रालयाच्या पुणे, दादर, ठाणे कल्याण अंबरनाथ खडकपाडा घाटकोपर येथे शाखा आहेत.

गेल्या 25 वर्षात 16 लाख पेक्षा जास्त लोकांची तपासणी करण्यात आली एक लाख 70 हजार पेक्षा अधिक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. पुणे शाखेत दररोज 90 पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी केली जाते. इशा रुग्णालयात 18 सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांची टीम कार्यरत आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदकुमार सातुर्डेकर, नेत्रालयाचे मार्केटिंग मॅनेजर गणेश कांबळे, मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह यशवंत बो-हाडे यांनी शिबिरासाठी पुढाकार घेतला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579